# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल:rahuri.amfu@gmail.com**

**५८) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७/०९/२०२१**

**जिल्हा : अहमदनगर**

| मागील आठवड्यातील हवामान (१०/०९/२०२१ ते १६/०९/२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१८/०९/२०२१ ते २२/०९/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | दिनांक | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| ०.० | ०.० | ३.६ | २.२ | १.८ | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ३ | १ | ६ | ९ | ५ |
| २९.८ | ३१.० | ३०.८ | २९.२ | २९.८ | २८.४ | २९.६ | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३१ | ३१ | ३० | २९ |
| २३.४ | २४.४ | २३.९ | २४.१ | २३.७ | २४.३ | २३.४ | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २३ | २३ | २२ |
| ०.० | ०.० | २.० | २.० | २.० | २.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | ७ | ७ | ७ | ६ | ८ |
| ८५.० | ८१.० | ८७.० | ८९.० | ८५.० | ८१.० | ८०.० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८७ | ८७ | ८६ | ८७ | ८६ |
| ५८.० | ६५.० | ७६.० | ६४.० | ६७.० | ५९.० | ५७.० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५७ | ५२ | ५१ | ५९ | ६४ |
| ५.० | ४.० | ६.२ | ४.८ | ५.१ | ५.१ | ३.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | ११ | १२ | १३ | १५ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.<br>पुढील पाच दिवस काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | १) शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल . शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत . तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे.<br>२) पिकावर कीटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.<br>३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.. |
| संदेश | | कपाशी: बोड अळीच्या नियंत्रणाकरिता लॅम्बडा-सायहालोथ्रीन ५% प्रवाही ८ मिली किंवा स्पिनोसॅड ४५ एस सी ३.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| कपाशी | बोंड धरणे | बोड अळीच्या नियंत्रणाकरिता लॅम्बडा-सायहालोथ्रीन ५% प्रवाही ८ मिली किंवा स्पिनोसॅड ४५ एस सी ३.५ मिली किंवा प्रोफेनोफोस ५० ईसी ३० मिली किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ ईसी १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| सोयाबीन | शेंगा भरण्याची अवस्था | चक्री भुंग्याच्या नियंत्रणाकरिता थायक्लोप्रीड २९.७ एस सी १५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| मका | दाणे चिकात असताना | अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणाकरिता थायमेथोक्झाम १२.६% + लॅम्डा सायहेलोथ्रीन ९.५% झेड सी या मिश्र कीटकनाशकाची ०.५ मिलि प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. किंवा क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५% एस सी या कीटकनाशकाची ०. ४ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. फवारणी करिताना औषध पानावर अथवा इतरत्र न फवारता पोंग्यामध्येच पडेल याची दक्षता घ्यावी जेणे करून औषधाचा परिणाम योग्य दिसेल. |
| तूर | फांद्या फुटण्याची अवस्था | तूर पिकावर खोड माशीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.<br>तूर पिकात वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच अशी रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. या रोगाचा प्रसार कोळी या किटकामार्फत होतो. कोळी नियंत्रणासाठी रासायनिक औषधाची फवारणी करावी. |
| भुईमुग | | वेळेवर पेरणी झालेल्या पिकाची काढणी करून घ्यावी. |
| बाजरी | | वेळेवर पेरणी झालेल्या पिकाची काढणी करून घ्यावी. |
| हरभरा | | कोरडवाहू हरभरा पिक पेरणीसाठी जमिनीची मशागत करावी. खरिप हंगामातील पिक काढणीनंतर काडीकचरा व धसकटे गोळा करुन घ्यावीत. कोरडवाहू हरभरा पिकाची पेरणी २० सप्टेंबरपासून पुढे करावी. |
| कांदा | | कांदा या पिकावर फुलकिडे व करपा आढळून आल्यास लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ ईसी. ६ मिली. + टेब्यूकोनॅझोल १० मिली + स्टिकर १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून साध्या हात पंपाने फवारणी करावी. |
| वांगी | | वांगी पिकावर शेंडे व फळ पोखरणारी अळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी एकात्मिक कीड नियंत्रण करावे.<br>किडग्रस्त शेंडे दर आठवड्यातून खुडून टाकावे आणि नष्ट करावेत.<br>तोडणीनंतर किडग्रस्त फळे गोळा करून जमिनीत गाडून टाकावीत.<br>तसेच अळीचे नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन १०% प्रवाही १० मिली किंवा इंडोक्झाकार्ब १४.५ ईसी. १० मिली किंवा स्पायनोसॅड ४५ ईसी ५ मिली किंवा क्लोरॅन्ट्रॅनीलीप्रोल १८.५ एससी ३ मिली प्रति १० लीटर पाण्यातून |

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल:rahuri.amfu@gmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | साध्या हात पंपाने फवारावे. अधून-मधून ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| टोमॅटो | | रस शोषणार्या किडींच्या नियंत्रणाकरिता इमिडाक्लोप्रीड ५ मिली किंवा थायोमोक्झाीम ४ ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यातून साध्या हात पंपाने फवारणी करावी.<br>फळ पोखरणारी अळीच्या नियंत्रणाकरिता सायपरमेथ्रीन १० ईसी १० मिली + ट्रायझोफॉस ३५% ईसी [संयुक्त किटकनाशक] २० मिली + टेब्यूकोनॅझोल १० मिली प्रति १० लीटर पाण्यातून साध्या हात पंपाने फवारणी करावी. अधून-मधून ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : १७/०९/२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरीतथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**